divyamarathi.com

## भीमा पुलासोबतच पंढारा रेल्वे पुलाचे काम लवकरच सुरू

सोलापूर | सोलापूर ते दौंड सेक्शनदरम्यान असलेल्या भीमा नदी पूल व पंढारा पुलावर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापासून गर्डर टाकण्याच्या प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल. गर्डर टाकल्यानंतर ट्रॅक टाकला जाईल. पुलावर काम करणे अवघड अाहे. दोन महिन्यात हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आरव्हीएनएलने ठेवले आहे. त्यानुसार आता कामाला सुरुवात होईल. भाळवणी ते वाशिंबे हा जवळपास २६ किमीचा मार्ग आहे. याचे दुहेरीकरणाचे काम सुरू आहे. वाशिंबे स्थानकाजवळच पंढारा ब्रीज आहे. यावर १ फेब्रुवारीपासून काम सुरू होईल. तसेच विभागातील सर्वात मोठा समजल्या जाणाऱ्या भीमा नदीच्या पुलावरही दुसरी मार्गिका टाकली जाणार आहे. एक किमीच्या या पुलावर जवळपास ७ गर्डर टाकले जाणार आहे. हे गर्डर नागपूरहून भाळवणी स्थानकावर दाखल झाले आहे. यासाठी किमान दोन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. हे काम किचकट तर आहेच शिवाय वेळखाऊ असणार आहे. या दरम्यान काही गाड्या रद्द होऊ शकतात.